CNR - MHKO130009022015

**श्रीमती सविता अशोक धवन विरुध्द चंद्रकांत गणू धवन, वगैरे**

## नियमित दिवाणी कज्जा नं.१८७/२०१५ मधील
## निशाणी क्र. ७८ खालील आदेश.

**१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १–अ ते १–ड यांनी 'ज्यादा कैफियत' दाखल करण्यास परवानगी मिळ्याकरीता दाखल केला आहे.

**२.** प्रतिवादीच्या कथनानुसार, प्रस्तुत प्रकरणी वादींनी दाव्यामध्ये दुरुस्ती करुन घेतली आहे. सदरची दुरुस्ती वादींनी मुद्दे निश्चित केल्यानंतर केली आहे. सदर दुरुस्ती दाव्याप्रमाणे प्रतिवादींनी त्यास ज्यादा कैफियत दाखल करणे अपेक्षित होते. मात्र, दरम्यानच्या कालावधीमध्ये प्रतिवादी क्र. १–अ ते १–ड यांचे पूर्वज चंद्रकांत धवन हे आजारी असल्याने दि. १४/०२/२०१९ रोजी मयत झाले व तद्नंतर, कोरोना महामारीमुळे प्रस्तुत वारसांना त्यांच्या वकीलांशी संपर्क साधून माहिती देता आली नाही. वादींनी दाव्यामध्ये केलेल्या दुरुस्तीच्या अनुषंगाने प्रतिवादींना अतिरिक्त कैफियत देण्याची आहे. तसे न झाल्यास प्रतिवादीचे नुकसान होईल असे प्रतिवादीचे कथन आहे. त्यामुळे, सदरचा अर्ज मंजूर करावा अशी प्रतिवादींची विनंती आहे.

**३.** सदर अर्जावरती वादी यांनी म्हणणे दाखल केले असून त्यांच्या कथनानुसार प्रतिवादी यांचा सदरचा अर्ज मुदतीत नाही. त्यांनी मुदतीत कैफियत दिली नाही. प्रस्तुत प्रकरणी वादीचा सरतपास दाखल केला आहे. असे असताना, सरतपास दाखल झाल्यानंतर दिलेला अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे असे वादीचे कथन आहे.

**४.** उभय बाजूच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

**५.** प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी यांचे वारस हे दि. १५/०२/२०२१ रोजी अभिलेखावर घेण्यात आले आहे असे रेकॉर्ड दर्शविते. निर्विवादपणे, दि. २५/०४/२०१८ रोजी निशाणी क्र. ५६ अन्वये वादीचा दावा दुरुस्तीचा अर्ज न्यायालयाने मंजूर केला आहे असे दिसून येते. निश्चितपणे, वादींनी केलेल्या दुरुस्तीच्या अर्जास अनुसरुन प्रतिवादींना ज्यादा म्हणणे मांडण्याची संधी देणे न्यायोचित होणार आहे. तसे न झाल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे उल्लंघन होईल. तसेच, प्रस्तुत प्रतिवादी हे मयत प्रतिवादी क्र. १ यांचे वारस असून वादींनी केलेल्या दाव्यातील दुरुस्तीच्या अनुषंगाने त्यांना याकामी जादा म्हणणे दाखल करण्याचे आहे. अभिलेखाचे अवलोकन करता, सदरच्या अर्जास प्रतिवादींनी विलंब केला आहे असे दिसून येते. सदर प्रकरणी वादीतर्फे सरतपासाचे शपथपत्र दि. २३/०६/२०२२ रोजी न्यायालयाने स्विकारले आहे असे दिसून येते. तरी, त्याचदिवशी अर्थात दि. २३/०६/२०२२ रोजी प्रस्तुत प्रतिवादीतर्फे ज्यादा कैफियत देणेकरीता अर्ज अभिलेखावर दाखल करण्यात आला आहे असे दिसून येते. सबब, दाव्याच्या कामी जो विलंब झाला आहे त्याकरीता, प्रतिवादीवर काही रक्कम खर्च म्हणून बसविणे योग्य राहील, करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र. ७८) प्रतिवादीने वादी यांना रक्कम रुपये २००/– ही खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर प्रतिवादीची कैफियत स्विकारण्यात येते.

Amol Bharat Jawale
Digitally signed by Amol Bharat Jawale
Date: 2022.08.11 17:43:39 +0530

कागल. (**ए.बी.जवळे**)

दिनांकः– ०८/०८/२०२२ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.